# महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे "आयडॉल्स"

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ "कृषि पदवीधर आयडॉल"

### ॲड. प्रदिप रंगनाथ खेडकर

कृषि उद्योजक, बी. एस्सी. (कृषि), एल.एल.बी., कृषि महाविद्यालय, कोल्हापूर
मु. पो. करंदी, ता. शिरुर, जि. पुणे




**उद्योगाचे नांव**
- हर्षित ॲग्रो फुडस् ॲण्ड एक्सपोर्ट

**कृषि उद्योगाची माहिती**
- सन २०१६ साली सुरुवात
- मुरघास (कॉर्न सायलेज) शास्त्रीय पध्दतीने तयार करुन विक्री तसेच मका लागवडी पासून काढणीपर्यंत शेतकऱ्यांना मार्गदर्शन
- मुरघास माध्यमातून पुणे, मुंबई, कोकण, उर्वरीत महाराष्ट्र व गुजरात येथील गोपालकांना उत्तम सेवा दिली जाते. या माध्यमातून एक हजारपेक्षा जास्त गोपालक जोडले गेले आहेत
- सुरुवातीला विक्री आणि करार शेती हे मोठे आव्हान होते, परंतु, आज २५००-३००० टन मुरघास विक्री वर्षाला होते

**उद्योगामधील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान**
- मुरघास हा हवाबंद करुन ठेवलेला आंबवलेला चारा वर्षभर आहे तसाच राहतो
- मुरघास बनवतांना चिकातील मक्याचा वापर केला जातो. त्यामुळे उत्तम गुणवत्ता टिकवुन ठेवता येते
- कडबा-कुट्टी मशीन व बॅग पॅकिंग मशीनचा मुरघास बनवतांना योग्य वापर केला जातो
- मुरघास हा ५० किलोच्या अतिनिल किरणे संरक्षित बॅगमध्ये यंत्राच्या सहाय्याने दाब देऊन बनविला जातो, ज्यामध्ये गुळ, मीठ, मिनरल मिक्चर व जिवाणू संवर्धके योग्य प्रमाणात वापरली जातात. मुरघास बॅगचा लहान आकार वाहतुकीस व वापरण्यास सुलभता प्रदान करतो
- मुरघास जनावरांना खाण्यासाठी पौष्टिक असतो, त्यामुळे दुध, फॅट वाढणे व जनावरांचे आरोग्य उत्तम राहण्या बरोबरच इतर पशुखाद्यावरील खर्च कमी होतो

**वार्षिक उलाढाल : रु. १.५० कोटी**

**व्यावसायिक / सामाजिक क्षेत्रातील योगदान**
- परिसरातील १००-२०० शेतकऱ्यांच्या पिकांना हमीभाव देण्यात येतो. सोबतच लागवडीपासुन काढणीपर्यंत योग्य मार्गदर्शन केले जाते
- व्यवसायामध्ये उच्चत्तम गुणवत्ता, वेळेवर माल पोहचविण्याची हमी व वर्षभर पुरवठा ही त्रिसुत्री जपली जाते
- कोव्हीडच्या काळात जेव्हा सर्व सेवा बंद होत्या व कामगारांचा तुटवडा असतांना सुध्दा हर्षित ॲग्रोने घरोघरी जाऊन मुरघास पुरवठा केला
- मागील दोन वर्षे कोल्हापूर परीसरातील पूरस्थितीमध्ये १०० टन मुरघास पाठवुन अनेक जनावरांना आधार दिला
- शेतकरी व गोपालक यांच्यासाठी शेतकरी प्रशिक्षण केंद्राची उभारणी केली
- ग्रामिण भागात कृषि ग्रंथालय उभारणी केली ज्याचा लाभ परीसरातील युवा शेतकरी घेत आहेत
- रोटरी क्लब पुणे कॅम्पच्या माध्यमातून ग्रामीण भागातील दुर अंतरावरुन शाळेला पायी ये-जा करणाऱ्या ५० गरजु मुलींना सायकल वाटप, शाळांना वॉटर फिल्टर, खेळाचे साहित्य व ई लर्निंग संचाचे वाटप
- रोटरी क्लब, पुणे कॅम्प सन २३-२४ करीता नियोजीत अध्यक्ष

**रोजगार निर्मिती**
- २० मजुरांना वर्षभर रोजगार उपलब्ध करुन दिला जातो







## महात्मा फुले कृषि विद्यापीठ "शेतकरी आयडॉल"

### श्री. विष्णु रामचंद्र जरे
### सौ. कमल विष्णु जरे

मु. बहिरवाडी, पो. जेऊर, ता. जि. अहमदनगर




**शिक्षण** : आठवी
**जमीनधारणा क्षेत्र** : २.९७ हेक्टर
**सध्या घेत असलेली पिके** : लसुण, कांदा व मुग

**शेतीमधील उल्लेखनीय संशोधन कार्य**
- कांदा पीक विविध वाणांचे प्रात्यक्षिक (बसवंत ७८०, फुले समर्थ) व लसुण पीक विविध वाणांचे प्रात्यक्षिक (फुले बसवंत, फुले निलिमा व भिमा पर्पल)
- सेंद्रियशेती अंतर्गत गांडुळखत, नाडेप, जिवामृत, दशपर्णी अर्क, जिवाणुखते व हिरवळीचे खत प्रात्यक्षिक
- श्रमदानातून गॅबियन बंधारे, वनराई बंधारे, तलाव व नालाबंडिंग गाळ काढणे
- बॉस्को ग्रामीण विकास केंद्र, केडगाव यांच्या समन्वयाने पाणलोट विकासाशी निगडीत विविध कामे केली
- मृद व जलसंधारण अंतर्गत विविध कामे

**पुरस्कार**
- वसंतराव नाईक कृषि भूषण पुरस्कार - २०१२-१३ (महाराष्ट्र शासन)
- वसंतराव नाईक कृषि सन्मान पुरस्कार - २०१२-१३(यवतमाळ)
- उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार - २०१३-१४ (आत्मा, अहमदनगर)
- उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार - २०१३-१४ (कांदा व लसुण राष्ट्रीय संशोधन केंद्र, राजगुरुनगर)
- भाऊसाहेब माने कृषि सन्मान पुरस्कार - २०१९-२० (डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला)

**तंत्रज्ञानाचा प्रसार**
- महाराष्ट्रासह देशातील सहा राज्यात शेतकरी संपर्क व मार्गदर्शन करत असतात तसेच कांदा व लसुण बियाणेचा पुरवठा करत असतात
- आकाशवाणी केंद्र, अहमदनगर प्रसारीत कृषि अदालत, हॅलो बळीराजा कार्यक्रमात बारा वेळा सहभाग नोंदविला
- आकाशवाणी केंद्र, पुणे वरुन प्रसारीत होणाऱ्या तीन कार्यक्रमात कांदा व लसुण पिकासंदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले
- दुरदर्शन केंद्र, मुंबई प्रसारीत कृषि दर्शन कार्यक्रमात दोन वेळा लसुण व कांदा पिकांबाबत मार्गदर्शन
- महात्मा फुले कृषि विद्यापीठ, कांदा व लसुण राष्ट्रीय संशोधन केंद्र, राजगुरुनगर व कृषि विभाग यांचेमार्फत आयोजित केलेल्या विविध उपक्रमांत सहभागी होऊन तंत्रज्ञानाचा प्रसार करतात

**वार्षिक उत्पन्न : रु. ९.०० लाख**








## विस्तार शिक्षण संचालनालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मार्च, २०२३